# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date – 10 February 2025

# Time 7.10 AM to 7.20 AM

# Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १० फेब्रुवारी २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- परीक्षा पे चर्चा कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा आज विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी संवाद.
- आनंदवनात पाचशे जणांसाठी निवासी रुग्णकेंद्रासह दिव्यांगांसाठीच्या देशातल्या पहिल्या कौशल्य विकास केंद्राची घोषणा.
- छत्तीसगडमध्ये सुरक्षा दलासोबतच्या चकमकीत ३१ नक्षलवादी ठार-दोन सैनिकांना वीरमरण.
- दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात इंग्लंडला पराभूत करत भारताची मालिकेत विजयी आघाडी.

आणि

- राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत अडथळ्यांच्या शर्यतीत तेजस शिरसेला सुवर्णपदक-धावपटू ऐश्वर्या मिश्राचीही सुवर्णपदकाला गवसणी.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी अकरा वाजता आठव्या परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांशी संवाद साधणार आहेत. दिल्लीत भारत मंडपम इथं हा कार्यक्रम होणार असून, या कार्यक्रमाचं थेट प्रसारण दूरदर्शन, आकाशवाणी तसंच सर्व वृत्त वाहिन्यावरून होणार आहे.

छत्रपती संभाजीनगर इथल्या सरस्वती भूवन प्रशालेचे विज्ञान शिक्षक मयुर साबळे यांनी या कार्यक्रमाचं महत्व या शब्दात विषद केलं.

***शिक्षण क्षेत्रामध्ये काम करत असताना या कार्यक्रमाचा प्रभाव मला आता जाणवतोय की पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांशी साधलेल्या या संवादामुळे निश्चितच***

***विद्यार्थ्यांमधील ताणतणाव कमी होतोय. सर्वात महत्वाची बाब म्हणजे या वर्षी या कार्यक्रमामध्ये जे एक्सपर्ट इनव्हॉल्व्ह केलेले आहेत, ते खरोखरच वाखाणण्याजोगं आहे. खरोखरच विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या क्षेत्रांचादेखील विचार केलाय. भारतातल्या ज्या प्रमुख परीक्षा आहेत, त्या परीक्षांमधले जे टॉपर आहेत, ते विद्यार्थ्यांशी शेअर करणार आहेत. तर एकंदरीत खरोखरीच विद्यार्थ्यांच्या उत्कृष्टतेसाठी आणि ताणतणाव कमी करण्यासाठी हा उपक्रम खरोखरीच मला महत्वपूर्ण वाटतो.***

हा कार्यक्रम परीक्षेतील तणावमुक्त अभ्यास करण्यासाठी प्रोत्साहन देणारा तसंच विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा महत्वपूर्ण उपक्रम असल्याची प्रतिक्रीया बीड इथले शिक्षक कृष्णा जाधव आणि विद्यार्थ्याने व्यक्त केली आहे.

***प्रधानमंत्री मोदीजी नी जो कार्यक्रम हाती घेतलेला आहे 'परिक्षा पे चर्चा' यामुळं शहरी भागातील विद्यार्थ्यां बरोबरच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना परीक्षेमध्ये न घाबरता, न कसलं प्रकारचं तणाव घेता, कसं सामोरं जावं, तसंच याचा फायदा विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षक यांना सुद्धा होतो.***

***विद्यार्थी हे फक्त विद्यार्थीच नाही. विद्यार्थी हे परीक्षार्थी नाही, तर भारताचे भविष्यातले चांगले नागरिक होणार. या दृष्टीकोनातूनच परीक्षा पे चर्चा ही मोहीम राबवली आहे. याचा फायदा आम्हासारख्या तुम्हासारख्या सर्वच विद्यार्थ्यांना होऊ शकतो.***

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज प्रयागराज इथं महाकुंभमेळ्याला भेट देणार आहेत. त्या त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान करणार असून,अक्षयावत आणि बडे हनुमान मंदीरालाही भेट देणार आहेत. डिजिटल महाकुंभा केंद्रातून त्या कुंभमेळ्याची पाहणी देखील करणार आहेत.

****

सहकार चळवळीतल्या संस्था नैतिक मूल्यांच्या आधारावर पारदर्शकपणे चालवल्यास या क्षेत्राची निश्चितच भरभराट होईल, असं राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी म्हटलं आहे. अहिल्यानगर इथं काल 'आंतरराष्ट्रीय सहकार परिषद २०२५' च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील उपस्थित होते. सहकार

क्षेत्रातल्या चुका लपवण्यापेक्षा त्या सुधारण्यावर भर द्यायला हवा, असं बागडे यांनी सूचित केलं. सहकार वर्षात काही नवीन उपक्रम हाती घेऊन अडचणीत असलेल्या संस्थांना मार्गदर्शन करणं आवश्यक असल्याचं त्यांनी सांगितलं. सहकारी संस्थांनी कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याचं आवाहन, सहकार मंत्री पाटील यांनी यावेळी केलं.

****

आनंदवनात पाचशे जणांसाठी निवासी रुग्णकेंद्र उभारण्यात येणार असून, दिव्यांगांसाठी देशातल्या पहिल्या कौशल्य विकास केंद्राची स्थापना आनंदवनात करण्यात येणार आहे. काल आनंदवनात मित्र मेळा या कार्यक्रमाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत समारोप झाला, त्यावेळी ही माहिती देण्यात आली. उद्योग मंत्री उदय सामंत यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२७ पर्यंत देश कुष्ठरोगमुक्त करण्याचं ठरवलं असून, आनंदवनसारख्या समाजसेवी संघटनांच्या मदतीनेच हे साध्य करता येईल, असं मुख्यमंत्री म्हणाले. आनंदवन या प्रकल्पाला दहा कोटी रुपयांचा विशेष निधी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली, रुग्णालयाला देण्यात येणारं अनुदान प्रतिरुग्ण २२०० वरुन सहा हजार पर्यंत तर पुनर्वसनासाठीचंही अनुदान दोन हजार वरुन सहा हजार पर्यंत वाढवल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

मानवी संवेदनेची व्याख्या बाबा आमटेंच्या कार्यातून पहायला मिळते, या प्रकल्पाशी जोडून घेण्यात लोकांना आज आत्मिक समाधान मिळतं, ही बाब गेल्या ७५ वर्षांच्या वाटचालीचं फलित असल्याचं मत मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केलं, ते म्हणाले...

> ***मानवी संवेदना याची व्याख्या ही आपल्याला बाबांच्या कार्यामध्ये पाहायला मिळते. ज्या काळामध्ये बाबांनी हे काम सुरू केलं, समाजामध्ये मान्यता तर सोडाच पण एक प्रकारचा तिरस्कार, आज मला आनंद आहे की पंच्याहत्तर वर्षांनंतर याठिकाणी समाजातले अनेक प्रथितयश लोकं येतात, आणि या प्रकल्पाशी जोडून घेण्यामध्ये आज लोकांना एक आत्मिक समाधान मिळतं किंबहुना आपण मोठे झालोत, अशा प्रकारची भावना निर्माण होतेय. पंच्याहत्तर वर्षांची ही जी वाटचाल आहे, ती खरोखर अत्यंत महत्वाची अशी वाटचाल आहे.***

****

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात काल सुरक्षादल आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत ३१ नक्षलवादी ठार झाले, तर दोन सैनिकांना वीरमरण आलं. चकमक झाली त्या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. नक्षलमुक्त भारत बनवण्याच्या दिशेनं सुरक्षा दलांना बिजापूरमध्ये हे मोठं यश मिळाल्याचं, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे.

****

इंग्लंडविरुद्ध झालेला दुसरा एकदिवसीय क्रिकेट सामना चार गडी राखून जिंकत भारताने मालिकेत दोन–शून्य अशी विजयी आघाडी घेतली आहे. काल ओडिशात कटक इथं झालेल्या या सामन्यात इंग्लंडच्या संघाने प्रथम फलंदाजी करत ३०४ धावा केल्या. भारताने कर्णधार रोहित शर्माच्या शतकी खेळीच्या बळावर हे आव्हान ४५ व्या षटकात पार केलं. ९० चेंडूत ११९ धावा करणारा रोहित शर्मा सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला. या मालिकेतला तिसरा आणि शेवटचा सामना परवा १२ तारखेला अहमदाबाद इथं होणार आहे.

****

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या तेजस शिरसे यानं पुरुषांच्या १०० मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत सलग तिसऱ्यांदा सुवर्णपदक पटकावलं, तर महिलांच्या ४०० मीटर शर्यतीत मुंबईच्या ऐश्वर्या शर्मा हिने नव्या स्पर्धा विक्रमासह सुवर्णपदक जिंकलं. या स्पर्धेत महाराष्ट्राने सर्वाधिक १२० पदकं जिंकली असून, २९ सुवर्ण, ४३ रौप्य आणि ४८ कांस्यपदकांसह पदकतालिकेत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे, ४२ सुवर्ण पदकांसह सेना दल पहिल्या तर ३१ सुवर्ण पदकांसह कर्नाटक दुसऱ्या क्रमांकावर आहे.

****

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी राज्यशासन कटिबद्ध असून, त्यादृष्टीने सर्वतोपरी मदत करण्याची ग्वाही, मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी दिली आहे. नांदेड जिल्ह्याच्या बिलोली तालुक्यात सगरोळी इथं काल राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सत्रात आभासी पद्धतीनं ते संबोधित करत होते. प्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या संमेलनाला आमदार जितेश अंतापुरकर, संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्रमोद देशमुख, राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. मार्तंड कुलकर्णी, साहित्यिक देविदास फुलारी यांच्यासह अनेक मान्यवर, साहित्य रसिक उपस्थित होते.

****

धाराशिव इथल्या नॅचरल उद्योग समुहाने तयार केलेल्या 'फर्मेंटेड ऑरगॅनिक मॅन्युअर' या सेंद्रीय खताची, राष्ट्रीय केमिकल्स् अॅण्ड फर्टिलायझर या राष्ट्रीयकृत कंपनीला विक्री करण्याचा शुभारंभ काल करण्यात आला. राष्ट्रीय केमिकल्स् अॅण्ड फर्टिलायझर या कंपनीचे धाराशिव आणि लातूर जिल्ह्याचे वरिष्ठ विपणन अधिकारी यावेळी उपस्थित होते. या सेंद्रीय खतामुळे सुपीक जमिनीची गुणवत्ता वाढणार असल्याचं, नॅचरल उद्योगचे संस्थापक अध्यक्ष बी.बी.ठोंबरे यांनी यावेळी सांगितलं.

****

अहिल्यानगर जिल्ह्यात चौंडी इथं काल पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती महोत्सवानिमित्त अभिवादन समारोह पार पडला. अहिल्यादेवी होळकर यांचं कार्य संपूर्ण देशवासियांसाठी प्रेरणादायी आहे, या शब्दांत विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

****

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने काल पूर्व उच्च प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात ५४ हजार ६८० विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली.

****

नांदेड जिल्ह्यात भोकर इथं अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायालयाच्या नवीन विस्तारीत इमारतीचं उद्घाटन काल मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा नांदेड जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी यांच्या हस्ते झालं. या विस्तारीत इमारतीमुळे सर्वांना पोषक वातावरण मिळून न्यायालयात येणाऱ्यांना न्याय मिळेल, असा विश्वास सूर्यवंशी यांनी व्यक्त केला.

****

अमेरिकेत भारतीय नागरीकांना देशाबाहेर काढण्याच्या प्रक्रियेचा निषेध म्हणून लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने काल अमेरिका आणि भारत सरकारच्या विरोधात निदर्शनं करण्यात आली. केंद्र सरकार निष्क्रिय असून मौन बाळगत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

****

मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने धाराशिव इथं छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त आज ध्वजारोहणाने विविध कार्यक्रमांची सुरुवात होणार आहे.

****